**लाल नाला मध्यम प्रकल्प,ता. समुद्रपूर, जि. वर्धा या योजनेस पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर.

**महामंडळ निर्णय क्रमांक:१२७**/विपाविम/कातां.२/(धा.क्र.३१/२०२०)/लाल नाला मध्यम प्रकल्प/ पंचम सुप्रमा /२०२३, दिनांक १४|०७|२०२३

**संदर्भ** :-
१. शासनाचे चतुर्थ सुप्रमा आदेश क्रमांक - सुप्रमा /२०१०/७९/(३५/२०१०)/मप्र दि.०५/१२/२०११
२. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ) मंत्रालय, मुंबई, दि.०९ सप्टेंबर २०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ कक्ष -१/ धा. क्र. (४७/२०२०)/४१०/२०२१, दि.२२/०६/२०२१
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०८.०४.२०२१ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक- २०२२/ (६५/२०२२) / लपा, दि. २७/०४/२०२२.
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ चे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र.८३/६

**प्रस्तावना** :

वर्धा जिल्ह्यातील समुद्रपुर तालुक्यातील लाल नाला मध्यम प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक एलएएन १०८१/१५३/२३४२ दि.३१/१०/१९८३ अन्वये प्रकल्पास रुपये ६८९.९४ लक्ष (रुपये सहा कोटी एकोणनव्वद लक्ष चौऱ्यान्नव हजार फक्त) किमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर दरसूची मधील वाढ, भूसंपादन किमतीतील वाढ, अभियांत्रिकी बदलामुळे प्रकल्पाचे किमतीत वाढ झाल्यामुळे शासन निर्णय क्रमांक, शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्रमांक एलएएन १०९२/ १२२५/ (२०६/९२) जसअ दि.१६/१०९९२ अन्वये प्रकल्पास रुपये १९०५ लक्ष (रुपये एकोणवीस कोटी पाच लक्ष फक्त) एवढ्या किमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. प्रकल्पाच्या किमतीत वर उल्लेख केलेल्या विविध बाबींमध्ये पुन्हा वाढ झाल्यामुळे प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक एलएएन २००१/१३६ /(४२/२००१) म.प्र., दिनांक १३/०५/२००२ अन्वये रुपये ५९१७.१३२ लक्ष (रुपये एकोणसाठ कोटी सतरा लक्ष तेरा हजार फक्त) एवढ्या किमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे महामंडळ स्तरावरून निर्णय क्रमांक विपाविम/कातां. २/२५५८/ तृतीय सुप्रमा/(धा.क्र. २६/२००६) दि.२९/०८/२००६ अन्वये रुपये १०३४८.६७९ लक्ष (रुपये एकशे तीन कोटी अठ्ठेचाळीस लक्ष सदुसष्ट हजार फक्त) एवढ्या किमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. प्रकल्पाच्या किंमतीत विविध बाबींमध्ये पुन्हा वाढ झाल्यामुळे प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक - सुप्रमा /२०१०/ ७९/ (३५/२०१०)/ मप्र, दि.०५/१२/२०११ नुसार रु.२०२५१.४५५ लक्ष (रुपये दोनशे दोन कोटी एकावन्न लक्ष पंचेचाळीस हजार फक्त) किंमतीस चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत चतुर्थ सूधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे योजनेस पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

लाल नाला मध्यम प्रकल्प योजनेच्या पंचम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. १८/०२/२०२१ रोजीच्या १५६ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

लाल नाला मध्यम प्रकल्प योजनेच्या पंचम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०८/०४/२०२१ रोजी झालेल्या मा. सचिव स्तरावरील उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.दि. १९/०६/२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/६ नुसार लाल नाला मध्यम प्रकल्प योजनेच्या रू. ३२६.७७ कोटी किंमतीच्या पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा.सचिव स्तरावरील उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रू. २०२.५१ कोटी च्या तुलनेत पंचम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. १२४.४१ कोटी ने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ. क्र. | बाब | वाढ रू कोटी | मंजुर चतुर्थ सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दरसुचीतील बदल व भाववाढ | २९.०५ | १४.३४ | २३.३५ |
| २ | जास्त दराची निविदा स्विकतीमुळे | ०.६८ | ०.३४ | ०.५४ |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ५४.७५ | २७.०३ | ४४.०१ |
| ४ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | अपु-या तरतुदीमुळे झालेली वाढ | २४.१८ | ११.९५ | १९.४४ |
| ५ | इतर कारणामुळे झालेली वाढ | -०.३२ | -०.१६ | - ०.२६ |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | १६.०७ | ७.९४ | १२.९२ |
| | **एकूण** | **१२४.४१** | **६१.४३** | **१००** |